RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ८०

दि.१७ जुलै २०२६, वार : शुक्रवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

# एमपीएससी ऑनलाइन परीक्षा तातडीने लागू होणार नाही

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे निर्देश, विद्यार्थी संघटनांच्या मागणीला यश

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या संगणकआधारित परीक्षा पद्धतीबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्त्वाचा निर्णय जाहीर केला आहे. विद्यार्थी संघटनांच्या सातत्यपूर्ण मागणीनंतर मुख्यमंत्री यांनी श्झ्प्ए अध्यक्ष विवेक भीमनवार, राज्याचे मुख्य सचिव आणि सामान्य प्रशासन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. या बैठकीत मुख्यमंत्री म्हणाले की, भरती प्रक्रिया सुरक्षित, पारदर्शक आणि वेळेत होणे आवश्यक आहे. मात्र, नवीन परीक्षा पद्धती लागू करताना विद्यार्थी आणि यंत्रणांना पुरेसा वेळ मिळणेही तितकेच




महत्त्वाचे आहे. यामुळे संगणकआधारित परीक्षा पद्धती तातडीने लागू न करता ऑगस्ट २०२७ पासून टप्प्याटप्प्याने अंमलात आणावी, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. तोपर्यंत श्झ्प्ए च्या परीक्षा सध्याच्या प्रचलित पद्धतीनेच घेतल्या जाव्यात, असेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, या संदर्भातील अंतिम निर्णय महाराष्ट्र लोकसेवा आयोग घेणार असून, बैठकीत मुख्यमंत्र्यांनी आयोगाच्या विविध सुधारणा उपक्रमांचेही कौतुक केले.

एमपीएससीच्या परीक्षा ऑफलाईन पद्धतीने घ्या, अशी मागणी एमपीएससीची तयारी करणा.्या विद्यार्थ्यांनी केली होती. परिणामी आंदोलनाचा देखील इशारा दिला होता. अशातच विद्यार्थी शिष्टमंडळाने नुकतीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची भेट घेतली होती. यावेळी आमदार अभिमन्यू पवार यांच्या मध्यस्थीने हि भेट घेण्यात आली होती. या बैठकीत मुख्यमंत्र्यांकडून सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन देण्यात आले होते. त्यांनतर एमपीएससी ऑनलाइन परीक्षा तातडीने लागू होणार नाही. संगणक आधारित परीक्षा प्रणाली ऑगस्ट २०२७ पासून लागू करा, असे निर्देश प्रशासन आणि विद्यार्थी संघटनांच्या बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.

तर या विषयी बोलताना आमदार अभिमन्यू पवार म्हणाले कि, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानतो की त्यांनी विद्यार्थी संघटनांची भावना लक्षात घेतली. ९० टक्क्यांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांची इच्छा होती की परीक्षा ऑफलाईन घेतली पाहिजे. विद्यार्थी यांना या निर्णयामुळे मोठा दिलासा मिळाला आहे, त्यांनी आता अभ्यास करावा. मुख्यमंत्री यांच्या सोबत बैठक झाली, त्यात त्यांनी स्पष्ट केलं की ऑनलाईन परीक्षा घेण्यासाठी यंत्रणा उभी करू. टप्प्याटप्प्याने परीक्षा आपल्याला देखील ऑनलाईन घ्याव्या लागतील, असेही ते म्हणाले.

## आयुक्त राहुल कुलकर्णी यांची खर्चकपातीवर नजर; महापालिकेतील अधिकाऱ्यांच्या वाहन सुविधेचा फेरविचार होणार?

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती अत्यंत बिकट असल्याने खर्चावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने विविध उपाययोजनांचा विचार सुरू असल्याची चर्चा आहे. अधिकारी व कर्मचाऱ्यांचे वेतन देण्यासाठीही आर्थिक अडचणी निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर अनावश्यक खर्च कमी करण्याची गरज व्यक्त होत आहे.



याच अनुषंगाने महापालिकेतील विविध विभागांच्या अधिकारी व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या शासकीय वाहनांच्या वापरावर फेरविचार करण्याची आवश्यकता व्यक्त केली जात आहे. शहरातील बहुतांश कार्यालये अल्प अंतरावर असल्याने अनेक अधिकाऱ्यांसाठी स्वतंत्र वाहन सुविधा कितपत आवश्यक आहे, याचा आढावा घेण्याची मागणी होत आहे.

वाहनांचा इंधन खर्च, देखभाल, दुरुस्ती आणि चालकांवरील खर्चामुळे महापालिकेवर मोठा आर्थिक भार पडत असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे अत्यावश्यक कामांसाठीच वाहनांचा वापर ठेवून इतर वाहन सुविधा कमी केल्यास महापालिकेच्या खर्चात लक्षणीय बचत होऊ शकते, असे मत व्यक्त केले जात आहे.

नूतन आयुक्त तथा आयएएस अधिकारी राहुल कुलकर्णी यांनी पदभार स्वीकारल्यानंतर महसूलवाढ, आर्थिक शिस्त आणि अनावश्यक खर्चावर नियंत्रण यावर भर दिला आहे. त्यामुळे वाहन सुविधेसह सर्व खर्चाचा आढावा घेऊन आवश्यक निर्णय घेतल्यास महापालिकेची आर्थिक घडी सुधारण्यास मदत होईल, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

## युजीसी नेट परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात प्रतिबंधात्मक आदेश जारी

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील एका परीक्षा केंद्रावर १७ व १८ जुलै, २०२६ या कालावधीत सीएसआयआर युजीसी नेट परीक्षा जून, २०२६ चे आयोजन करण्यात आले असून, ही परीक्षा सकाळी ९ ते १२ व दुपारी ३ ते ६ अशा दोन सत्रांमध्ये घेतली जाणार आहे. या पार्श्वभूमीवर परीक्षा सुरळीत व शांततापूर्ण वातावरणात पार पाडण्यासाठी लातूरचे जिल्हादंडाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरामध्ये प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

या आदेशानुसार परीक्षा केंद्राच्या परिसरात परीक्षार्थीशिवाय अन्य पाच किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्तींना एकत्रित प्रवेश करण्यास तसेच कोणत्याही प्रकारच्या घोषणा देण्यास व शांततेस बाधा निर्माण होईल असे कृत्य करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. तसेच परीक्षा कालावधीत केंद्राच्या १०० मीटर परिसरातील सर्व झेरॉक्स सेंटर्स, दुकाने, पानटपऱ्या, टायपिंग सेंटर्स, एसटीडी बुथ आणि ध्वनिक्षेपक इत्यादी माध्यमे आदेशाची मुदत संपेपर्यंत पूर्णपणे बंद ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

याशिवाय परीक्षा केंद्र परिसरात मोबाईल फोन, सेल्यूलर फोन, ई-मेल व इतर प्रसार माध्यमे घेऊन जाण्यास बंदी घालण्यात आली असून, कोणत्याही अनधिकृत व्यक्तीला किंवा वाहनाला प्रवेश दिला जाणार नाही. हे प्रतिबंधात्मक आदेश १७ व १८ जुलै २०२६ रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत लागू राहतील. परीक्षा उपकेंद्रावर कार्यरत असलेले अधिकारी, कर्मचारी, परीक्षार्थी, निगराणी अधिकारी आणि पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना त्यांच्या शासकीय कर्तव्ये पार पाडण्याच्या अनुषंगाने या आदेशातून वगळण्यात आले आहे.

## फेसबुक प्रेमासाठी पाकिस्तान गाठणारा भारतीय तरुण लाहोरच्या तुरुंगात

**मुंबई/प्रतिनिधी :** उत्तर प्रदेशातील अलीगढ शहरातील एका व्यक्तीने फेसबुकवर मैत्री झालेल्या एका महिलेच्या शोधात व्हिसाशिवाय पाकिस्तानमध्ये प्रवेश केला. मात्र त्याची ओळख संशयास्पद वाटल्याने त्याला तुरुंगात टाकण्यात आले. शिक्षा पूर्ण केल्याच्या काही महिन्यांनंतरही त्याला लाहोरच्या कोट लखपत जेलमध्ये ठेवण्यात आले आहे. त्याच्या कुटुंबाकडून सरकारकडे त्याला परत आणण्याची विनंती केली जात आहे. बादल बाबु हा दिल्लीमध्ये टेलरिंगचं काम करत होता. त्याची सना नावाच्या पाकिस्तानी महिलेशी फेसबुकवर ओळख झाली. कुटुंबियांनी दिलेल्या माहितीनुसार त्यांची मैत्री प्रेमात बदलली. बादल याच्याशी त्यांचा शेवटचा संवाद ३० आक्टोबर २०२४ रोजी झाला. बेपत्ता होण्यापूर्वी त्याने आपली सर्व कागदपत्रे घरीच ठेवली होती, असेही त्याच्या कुटुंबियांनी सांगितले.

## राज्यपालांची छत्रपती शिवाजी महाराज वस्तु संग्रहालयाला भेट

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी गुरुवारी (दि.१६) मुंबईतील ऐतिहासिक छत्रपती शिवाजी महाराज वस्तु संग्रहालयाला भेट देऊन विविध कलाशैलींमधील ऐतिहासिक व कलात्मक वस्तूंच्या संग्रहाचे अवलोकन केले.

यावेळी राज्यपालांनी संग्रहालयाच्या कार्याचे कौतुक केले तसेच देशातील नामशेष होत चाललेल्या पारंपरिक कलांचे जतन करण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले.

संग्रहालयाचे महासंचालक सव्यसाची मुखर्जी यांनी राज्यपालांना संग्रहालयाचा इतिहास, वाटचाल आणि कार्याची माहिती दिली. त्यांनंतर त्यांनी संग्रहालयातील अन्य क्युरेटर्ससह प्राचीन भारत व विश्व दालन, शिल्पकला दालन, हिमालयीन कला दालन तसेच लघुचित्रे आणि वस्त्र संग्रहालय दाखवले.

वस्तू संग्रहालय आपले फिरते संग्रहालय तसेच इतर जनजागृती कार्यक्रमांद्वारे सर्वसामान्य नागरिक आणि विद्यार्थ्यांमध्ये देशाच्या समृद्ध वारशाबाबत जागरूकता आणि संवेदनशीलता निर्माण करण्याचे कार्य करीत असल्याचे मुखर्जी यांनी सांगितले.

## विनायक राऊतांना अटक करा! – दमानिया

**मुंबई/प्रतिनिधी :** उबाठा गटाचे माजी खासदार विनायक राऊत यांच्यावर त्यांच्या सुनेने केलेल्या गंभीर आरोपांनंतर सामाजिक आणि राजकीय वर्तुळातून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनीही या प्रकरणात नाराजी व्यक्त करीत राऊत यांना तातडीने अटक करण्याची मागणी केली आहे. ''विनायक राऊत यांच्या जागी जर कोणी सर्वसामान्य व्यक्ती असती, तर आतापर्यंत त्याला तात्काळ अटक करून कायद्याचा बडगा उगारला असता. मात्र, राजकीय नेत्यांच्या बाबतीत तसे घडताना दिसत नाही,'' अशा शब्दांत दमानिया यांनी नाराजी व्यक्त केली.

माध्यमांशी संवाद साधताना अंजली दमानिया म्हणाल्या, ''माझ्या मनात कोणाच्याही कौटुंबिक जीवनात पडण्याची काडीमात्र इच्छा नाही. परंतु, एका माजी खासदारावर आणि त्यांच्या कुटुंबावर कौटुंबिक छळाचे कलम ८५ तसेच नरबळी व अघोरी प्रथा प्रतिबंधक कायद्याचे कलम ३(२) आणि ३(३) लागणे



हे अत्यंत धक्कादायक आहे. सार्वजनिक पदावर राहिलेल्या व्यक्तीच्या कुटुंबावर जेव्हा इतके गंभीर आरोप होतात, तेव्हा त्याची चौकशी पूर्णपणे पारदर्शक पद्धतीनेच व्हायला हवी'', अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. विनायक राऊत यांची सून गिरिजा राऊत यांनी पती गीतेश राऊत, सासरे विनायक राऊत यांच्यासह कुटुंबातील एकूण ७ जणांविरुद्ध कौटुंबिक छळ आणि अंधश्रद्धा प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे. २०१७ मध्ये विवाह झाल्यानंतर ऊटी येथे हनीमूनला गेले असता पती गीतेश याने शारीरिक संबंध ठेवण्यास नकार दिला व शारीरिक जवळीक साधण्याचा प्रयत्न केल्यास टाळाटाळ केली, असा आरोप गिरिजा यांनी तक्रारीत केला आहे. याशिवाय २०१८ मधील ऑस्ट्रेलिया दौऱ्यात पतीने शिवीगाळ करत जबर मारहाण केली आणि 'मला हात लावशील तर विधवा होशील' अशी धमकी दिल्याचा तपशीलही त्यांनी पोलिसांत दिला आहे. पती शारीरिक संबंध ठेवण्यास असक्षम असल्याने सासरच्या मंडळींनी जादूटोणा आणि अघोरी उपायांचा अवलंब केल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला असून, या गुन्ह्यात पोलिसांनी अघोरी कृत्य करणाऱ्या फिरोज शेख या भोंदूबाबाला आधीच अटक केली आहे.

दरम्यान, सुनेच्या छळ प्रकरणात न्यायालयाने विनायक राऊत यांना तात्काळ अंतरिम संरक्षण देण्यास नकार दिला असून, त्यांच्या अटकपूर्व जामीन अर्जावर आता २३ जुलै रोजी सुनावणी होणार आहे. तोपर्यंत त्यांच्यावर अटकेची टांगती तलवार कायम आहे.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान समोरील अतिक्रमण काढण्याची लातूर शहर पूर्व भाग कृती समितीची मागणी




**लातूर/प्रतिनिधी :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान गेट समोरील अतिक्रमण काढण्याची लातूर शहर पूर्व भाग कृती समितीची प्रसिद्धी पत्रकान्वय मागणी लातूर शहरातील मुख्य मार्गावर एकमेव सार्वजनिक सुसज्ज असलेले डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यानात अनेक नागरीक,विद्यार्थी,वाचक वर्ग इत्यादि मोठी वर्दळ या उद्यानात असुन उद्यानाच्या मुख्य गेटवर दोन्ही बाजुने अतिक्रमण झाले असून अतिक्रमण धारक उद्यानाच्या गेट समोर व मध्यभागी अतिक्रमण करीत खुर्च्या टाकुन बसतात व सदरील स्टॉल वरील कचऱ्याचे ढीग मोठ्या प्रमाणात दिसून येतात तसेच उद्यानाचा मुख्य गेट व चौक लगत असल्याने या अतिक्रमणामुळे वाहतुकीची कोंडी होत आहे.

महानगरपालिका अतिक्रमण विभाग कार्यालयाचे दुर्लक्ष गंभीर बाब असुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान गेट समोरील अतिक्रमण तात्काळ काढण्याची मागणी लातूर शहर पूर्व भाग कृती समितीच्या प्रसिद्धी माध्यमातुन करण्यात आली असून सदरील अतिक्रमण काढण्या संदर्भात तात्काळ सकारात्मक कार्यवाही नाही झाल्यास लोकशाही मार्गाने तिव्र आंदोलन छेडण्यचा ईशारा पूर्व भाग कृती समितीचे अध्यक्ष दिपक गंगणे,सचिव बाबासाहेब बनसोडे यांनी दिला आहे.

## कारखाना मालकीचे ऊस तोडणी यंत्र भाड्याने चालविण्यास घेणेसाठी अर्ज करण्याचे ट्वेंन्टीवन शुगर्स चे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** मळवटी (ता. जि.लातूर) ट्वेंन्टीवन शुगर्स लि. मळवटी या साखर कारखान्याने गाळप हंगाम २०२६-२७ साठी कारखाना मालकीचे ऊस तोडणी यंत्र (हार्वेस्टर) भाड्याने चालविण्यास देण्याबाबत निर्णय घेतलेला असुन ऊस तोडणी यंत्र ट्वेंन्टीवन शुगर्स लि. कडे भाडयाने चालविण्यास घेणेसाठी अर्ज करण्याचे जाहीर आवाहन केले आहे. या निर्णयामुळे स्थानिक ऊस उत्पादक शेतकरी व ऊस तोडणीचा अनुभव असलेल्या कंत्राटदारांना रोजगाराची व व्यवसाय वृद्धीची संधी उपलब्ध होणार आहे.

कारखान्याच्या वतीने देण्यात आलेल्या माहितीनुसार, कारखान्याच्या मालकीचे न्यु हॉलंड-४०१० व शक्तीमान कंपनीचे आधुनिक ऊस तोडणी यंत्र (हार्वेस्टर) इच्छुकांना भाड्याने देण्यात येणार आहेत. या उपक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे ऊस तोडणी प्रक्रियेत यांत्रिकीकरणाला चालना देणे आणि शेतकरी व तोडणी वाहतूक कंत्राटदार यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे हा आहे.

विशेषतः सध्या ऊस तोडणी मजुरांच्या कमतरतेमुळे ऊस तोडणीमध्ये येणाऱ्या अडचणी लक्षात घेता. हार्वेस्टरच्या वापरामुळे या समस्येवर मोठ्या प्रमाणात पर्याय उपलब्ध होणार असल्याचे कारखाना प्रशासनाने नमूद केले आहे.

कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकरी व ऊस तोडणीचा अनुभव असलेले कंत्राटदार यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. इच्छुकांनी विहित नमुन्यातील अर्ज कारखाना कार्यस्थळावरील शेतकी कार्यालयात दिनांक २० जुलै २०२६ पुर्वी सादर करणे आवश्यक आहे.


गाळप हंगाम २०२६-२७ साठी हार्वेस्टर भाड्याने देण्याचा निर्णय हा शेतकरी व कंत्राटदार यांना लाभदायक ठरणार असून, ऊस तोडणी प्रक्रियेला गती देण्यास महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. इच्छुकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन कारखान्याच्या वतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क- श्री. जोगदंड ९६२३०११६१६, श्री. साळुंके ९७०२५०००५५ यांच्याशी करावा.

## सहकार मंत्री पाटील यांच्याकडून हणमंतवाडी येथील शासकीय वसतिगृह बांधकामाची पाहणी

**लातूर/प्रतिनिधी :** राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी चाकूर तालुक्याच्या दौऱ्यादरम्यान हणमंतवाडी येथे भेट दिली. यावेळी त्यांनी समाज कल्याण विभागामार्फत उभारण्यात येत असलेल्या अनुसूचित जातीच्या मुला-मुलींच्या शासकीय वसतिगृह इमारत बांधकामाची प्रत्यक्ष पाहणी केली. हे बांधकाम पूर्णपणे दर्जेदार, विहित मुदतीत पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

वसतिगृह इमारत बांधकामाची प्रत्यक्ष पाहणी करताना त्यांनी कामाचा वेग, वापरण्यात येणारे साहित्य आणि एकूण गुणवत्ता याबाबत उपस्थित अधिकाऱ्यांशी चर्चा केली. विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी उभारण्यात येणाऱ्या अशा महत्त्वपूर्ण शासकीय प्रकल्पांमध्ये कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही, असे स्पष्ट करत त्यांनी दर्जेदार कामाला सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या सूचना दिल्या.

यावेळी उपस्थित असलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी कामाच्या सद्यस्थितीची व प्रगतीची माहिती दिली. या पाहणी दौऱ्याप्रसंगी जिल्हा परिषद उपाध्यक्ष दयानंद सुरवसे, जिल्हा परिषद सदस्य भानुदास पोटे, अनिल वाडकर यांच्यासह सार्वजनिक बांधकाम विभागाचे वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



## संपादकीय...

## कौशल्याधारित शिक्षणाचे महत्त्व आणि भविष्यातील संधींविषयी...

बदलत्या रोजगारविश्र्वात केवळ पदवी नव्हे, तर कौशल्य, अनुभव आणि सातत्याने शिकण्याची वृत्ती हीच यशाची खरी गुरुकिल्ली ठरत आहे. जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त कौशल्याधारित शिक्षणाचे महत्त्व आणि भविष्यातील संधींविषयी... नोव्हेंबर २०१४ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाने १५ जुलै हा दिवस 'संयुक्त युवा कौशल्य दिन' म्हणून घोषित केला. या निर्णयामागील विचार अत्यंत स्पष्ट होता. जगभरातील युवकांना रोजगारक्षम बनविण्यासाठी, स्वावलंबी घडविण्यासाठी आणि बदलत्या काळाशी जुळवून घेण्याची क्षमता विकसित करण्यासाठी कौशल्य शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य मिळाले पाहिजे. दुर्दैवाने आपल्या देशातील शिक्षणव्यवस्थेचा मोठा भाग अजूनही परीक्षा, गुण आणि पदवी यांच्या चक्रव्यूहात अडकलेला दिसतो. विद्यार्थ्यांच्या हातात पदवी येते; पण अनेकांच्या हातात काम करण्याचे कौशल्य नसते. परिणामी, एकीकडे लाखो सुशिक्षित युवक रोजगाराच्या शोधात भटकताना दिसतात, तर दुसरीकडे उद्योग, व्यापार आणि सेवा क्षेत्राला योग्य कौशल्य असलेले मनुष्यबळ मिळत नाही. हीच आजची सर्वात मोठी शोकांतिका आहे. एकविसाव्या शतकातील यशाचे सूत्र अत्यंत सोपे आहे. पदवी+कौशल्य+कार्यानुभव+सकारात्मक मनोवृत्ती = करीअर. या चार गोष्टींपैकी एक जरी कमी पडली, तर स्पर्धेच्या जगात मागे पडण्याची शक्यता वाढते. केवळ पदवी मिळवून करिअर घडत नाही. ज्ञानाला कृतीची जोड आणि कृतीला अनुभवाची साथ मिळाली, तरच व्यक्तिमत्त्व सक्षम बनते. योग्य अभिरुची, सकारात्मक दृष्टिकोन आणि संघभावनेने काम करण्याची क्षमता हीच खरी प्रगतीची गुरुकिल्ली ठरते. प्रत्येक माणूस जन्माला येताना ईश्र्वराकडून एक वेगळी देणगी घेऊन येतो. प्रत्येकाची बुद्धी, आवड, कल्पकता, हातोटी आणि कलागुण वेगळे असतात. कोणाला चित्रकलेची आवड असते, कोणाला संगीताची, कोणाला गणिताची, कोणाला संवाद साधण्याची, तर कोणाला नेतृत्व करण्याची. दुर्दैवाने आपण सर्व विद्यार्थ्यांना एका मोजपट्टीने मोजण्याचा प्रयत्न करतो. गुणपत्रिकेतील आकडेच विद्यार्थ्याचे भविष्य ठरवतील, असा गैरसमज अजूनही समाजात आहे. आधुनिक संशोधनातून मल्टिपल इंटेलिजन्सची कल्पना पुढे आली आहे. प्रत्येक व्यक्तीची बौद्धिक क्षमता वेगवेगळ्या क्षेत्रांत प्रकट होत असते. त्यामुळे कारकीर्द निवडताना स्वतःची ताकद, आवड आणि क्षमता ओळखणे अत्यंत आवश्यक आहे. स्वतःला समजून घेतलेला विद्यार्थी योग्य क्षेत्र निवडतो आणि त्या क्षेत्रात उत्कृष्ट यश मिळवतो. दुसऱ्यांचे अनुकरण करण्यापेक्षा स्वतःचा मार्ग शोधणे अधिक महत्त्वाचे आहे. आज आपण ज्ञानाच्या विस्फोटाच्या युगात जगत आहोत. विज्ञान आणि तंत्रज्ञानाची प्रगती इतक्या वेगाने होत आहे की, कालचे आधुनिक मानले गेलेले तंत्रज्ञान आज जुने ठरत आहे. नवीन साधने, नवीन पद्धती, नवीन व्यवसाय आणि नवीन संधी सातत्याने निर्माण होत आहेत. जागतिक स्पर्धा आणि खुल्या अर्थव्यवस्थेमुळे कामाचे स्वरूप पूर्णपणे बदलले आहे. आज अनेक क्षेत्रांत कामाच्या तासांपेक्षा कामाच्या गुणवत्तेला अधिक महत्त्व दिले जाते. ज्याच्याकडे अधिक कौशल्य, अधिक वेग, अधिक सर्जनशीलता आणि अधिक जबाबदारी आहे, त्यालाच अधिक संधी मिळते. नवीन ज्ञान स्वीकारणे, नवीन कौशल्ये आत्मसात करणे आणि बदल स्वीकारण्याची तयारी ठेवणे हीच यशाची खरी गुरुकिल्ली आहे. आपल्या कामाशी संबंधित नवीन तंत्र, नवीन साधने, नवीन कार्यपद्धती आणि नवीन विचार शिकण्याची सवय माणसाला कायम स्पर्धात्मक ठेवते. बदलत्या रोजगार विश्र्वात टिकून राहण्यासाठी ही सवय अमूल्य ठरते. ज्याने शिकणे थांबवले, त्याची प्रगतीही थांबते; पण जो सातत्याने शिकत राहतो, त्याच्यासाठी प्रत्येक बदल नवी संधी घेऊन येतो. राष्ट्रीय युवा कौशल्य दिन हा केवळ दिनदर्शिकेतील एक दिवस नाही. तो प्रत्येकाला स्वतःच्या भविष्याचा आरसा दाखवणारा दिवस आहे. शाळा, महाविद्यालये, पालक, उद्योग क्षेत्र आणि शासन यांनी मिळून कौशल्याधारित शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य दिले, तर भारत जगातील सर्वात सक्षम युवा शक्ती बनू शकतो. पदवीला कौशल्याची जोड, कौशल्याला अनुभवाची साथ आणि अनुभवाला सातत्याने शिकण्याची वृत्ती मिळाली, तर कोणताही युवक यशाच्या शिखरावर पोहोचू शकतो. आता वेळ आली आहे गुणांच्या शर्यतीतून बाहेर पडण्याची आणि गुणवत्तेच्या प्रवासाला सुरुवात करण्याची. कारण, भविष्य त्यांचेच असणार आहे, जे शिकत राहतील, बदल स्वीकारतील आणि कौशल्याच्या बळावर स्वतःचे तसेच राष्ट्राचे भविष्य घडवतील.

# भिमाच्या रथाचे सारथी आणि स्वार्थी!; मस्तक सशक्त करणारे पुस्तक

**नवनाथ दत्तात्रय रेपे**
**'कमळातील चिखल!'**
**या पुस्तकाचा लेखक**

---------------

पुस्तक माणसाचं मस्तक सशक्त करतात असे सर्रासपणे सांगितले जात असले तरी ते पुर्ण सत्य समजणे चुकीचे आहे. कारण तर्कशास्त्र, विज्ञानवादी आणि मानवतावादी लिखाण असलेली पुस्तकच माणसाचे मस्तक सशक्त करतात बाकी अंधश्रद्धा, बुवाबाजी, चमत्कार आणि विषमतावादी मांडणी केलेली पुळचट पिवळी पुस्तकं



माणासाचे मस्तक असक्त करतात.

आता लोक म्हणतील की, पुस्तकच जर माणसाची मस्तक सशक्त आणि असक्त करण्याचे काम करीत असतील तर मग तरुणांनी नेमकी कोणत्या पुस्तकाची निवड केली पाहिजे. त्यामुळे मी एवढेच सांगेल की, गोरखपूर गीता प्रेसच्या पिवळ्या पुस्तकांचा आधार अर्थात संदर्भ घेऊन उत्पादित झालेली पिलावळ म्हणजे तिची विषमतावादी अपत्य गोंजारत वेळ घालवण्यात कुठलेही शहाणपण नाही. जर आमच्या बहुजन समाजातील तरुणांना पुस्तकच वाचायचे असतील त्यांनी बुद्ध, शिव, फुले, शाहु आणि आंबेडकर यांचा मानवतावादी लोककल्याणकारी विचार सांगणारी बहुजन समाजातील लेखकांनी लिहिलेली पुस्तके वाचली पाहिजेत. कारण चातुर्वर्ण्य व्यवस्थेत ब्रह्ममुखातून अलगदपणे लाळेतून बाहेर पडलेल्यांनी आम्हा बहुजन शुद्रांना लिहिण्याचा बोलण्याचा अधिकार न दिल्याने भुदेवाची वाणी म्हणजे सकाळची सुमधूर गाणी ऐकण्यात आमच्या अनेक पिढ्या खर्ची गेल्या.


परंतू जसेही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या अथक परिश्रमाने संविधानाची निर्मिती करून त्याची २६ जानेवारी १९५० रोजी जी अंमलबजावणी झाली ती आमच्या शुद्रा अतिशुद्रांच्या बाहुमध्ये दहा हत्तीचे बळ निर्माण करून देणारी आहे. म्हणून तर वीर उत्तमराव मोहिते, दिनकरराव जवळकर, प्रा. मा. म. देशमुख यांनी आपल्या वैचारिक लेखणीने भुदेवांच्या जानव्याचे तंतू ढिले केले. ही गोष्ट काही साधारण नव्हती. म्हणून तर मनुवादी व्यवस्था टिकून रहावी यासाठी प्रयत्न करणा-या जाणव्यातील ततूंनी बहुजनातील जंतू हाताशी धरण्याचा जो कार्यक्रम केला. त्यात प्रत्येक जाती धर्मातील गोबरकीडे या व्यवस्थेचे वाहक झाल्याचे दिसत आहे. परंतू हे वाहक अनेकांना नाहक त्रास देत असतानाही बहुजन समाजातील लोक त्यांना नेता म्हणून स्विकारतात ही खुप मोठी शोकांतिका असली तरी ते प्रत्येकालाच समजेल हे सांगता येत नाही. म्हणून तर आपल्यात दबा धरुन बसलेले मनुवादी स्वार्थी आणि बहुजन महापुरुषांच्या विचारांचे खरे सारथी यांची ओळख होणे गरजेचे आहे. एखदा ती ओळख झाली तर त्यांचा करेक्ट कार्यक्रम लागल्याशिवाय राहणार नाही. त्यासाठी आमचे मित्र विनोद पंजाबराव सदावर्ते यांनी आपल्या भिमाच्या रथाचे सारथी आणि स्वार्थी! या पुस्तकातून जो प्रयत्न केला तो नुसता कौतुकास्पदच नव्हे तर धाडसी सुद्धा आहे. कारण अवैचारिक गुलामांच्या देशात विचारांची पेरणी करणे वाटते सोपे काम नाही हे गोविंद पानसरे यांच्यावर आलेल्या प्रसंगावरून सहज लक्षात येते. तरीही विनोद सदावर्ते आपल्या पुस्तकात म्हणतात की, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आमच्यासाठी सर्व काही करून ठेवले आहे. ते टिकवायचे कसे हे ही आम्हाला सांगितले आहे. परंतु स्वतःच्या स्वार्थासाठी आम्ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचा स्विकारच करत नाही. बाबासाहेब आंबेडकर यांनी एकीचा संदेश दिला. परंतु आम्ही बेकीने राहून शेकडो गट तट निर्माण केले आणि स्वतःची झोळी भरण्यासाठी लाचारी, मांडवली सुरू केली.'

लेखक विनोद पंजाबराव सदावर्ते यांनी लिहिलेले 'भिमाच्या रथाचे सारथी आणि स्वार्थी!' हे पुस्तक २६ एप्रिल २०२६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव शिक्रापूर, जि. पुणे याठिकाणी प्रकाशित केले. या पुस्तकाचे मुखपृष्ठ नजरेस पडल्यानंतर सदावर्ते यांना नेमके काय सांगायचे आहे हे त्यालाच कळते ज्यांचा मेंदू जागृत आहे. ज्यांच्या मेंदुला रेशिमबागेतील विषाणूने दंश केला आहे त्यांना लेखक सदावर्तेच्या लिखाणाचा अंश तरी समजावा हाच 'भिमाच्या रथाचे सारथी आणि स्वार्थी!' हे पुस्तक छपाई करण्यामागचा रुक्माई प्रकाशन, अंजनडोह (बीड) चा मुख्य उद्देश असल्याचे प्रकशकांनी आपल्या मनोगतात व्यक्त केले आहे. कारण विषाच्या दंशावर तत्काळ गुणकारी औषधांचा अंश दिला की त्या विषाची दाहकता कमी होते. म्हणजे विषमतावादी विचारांना रोखण्यासाठी सदावर्ते यांनी या पुस्तकाच्या माध्यमातून मानवतावादाचा अंश दिला असून तो नक्कीच कामी येईल ही अपेक्षा आहे. लेखकाने हे पुस्तक सम्राट चंद्रगुप्त मौर्य यांच्या चरणी अर्पण केले आहे. या पुस्तकात आपल्या मनोगतात लेखक विनोद सदावर्ते म्हणतात की, 'मोठेपणासाठी लाखों रुपये खर्च करणारे लोक शिक्षण, आरोग्य किंवा रोजगारासाठी खर्च करताना दिसत नाही तेव्हा मात्र ते बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचे कसे असु शकतात हा प्रश्न निर्माण होतो. हे सर्व उदाहरण फक्त आपण प्रत्येकजन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वारस समजून चळवळीचा रथ, विचाराचा रथ मीच हाकतो की काय या भ्रमात सर्वजन आहेत. स्वतःला बौद्ध समजून, दररोज फक्त जयभीम बोलुन कोणीच भिमाच्या विचाराचे होऊ शकत नाही.' लेखकाने मांडलेले हे वास्तव अनेकांना पटणार नाही. परंतू कोणाला तरी चांगले वाटावे यासाठी लेखक आपला लेखप्रपंच करीत नाहीत यावरून सिध्द होते. 'भिमाच्या रथाचे सारथी आणि स्वार्थी' या पुस्तकात एकूण ३० प्रकरणांचा समावेश आहे. हे पुस्तक केवळ पैसा आणि प्रतिष्ठा मिळविण्यासाठी केलेली धडपड नसून समाजाच्या मस्तकाची वैचारिक मशागत करण्यासाठी घेतलेले परिश्रम आहेत. म्हणून तर लेखकाने या पुस्तकाचा नेमक उद्देश स्पष्ट करताना म्हटले आहे की, 'या पुस्तकाचा उद्देश हा केवळ पुस्तक छापून विक्री करणे नाही. तर या माध्यमातून तरुण पिढीला वाचणाची आवड निर्माण करणे आणि समजाचा पैसा नाचगाण्यावर खर्च होण्यापासून वाचवणे व वाचलेला पैशाच्या माध्यमातून स्वतःच्या शाळा, हॉस्पिटल, बँक उभे करून समाजाला स्वावलंबी बनवणे हा आहे. आणि हे सर्व शक्य आहे. नाचगाण्यासाठी आपण एका दिवशी करोडो रुपये खर्च करतो. तेच पैसे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारने खर्च केले तर आपल्याला उत्पन्नाची साधने निर्माण होऊन आर्थिक संपन्नता येईल. जेव्हा समाजातील प्रत्येक घटकांची आर्थिक संपन्नता, शैक्षणीक संपन्नता येईल तेव्हाच ख-या अर्थाने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केल्याचा आनंद होईल.' सदावर्ते यांनी मांडलेले मत बहुजन समाजाने विचारात घेतले तर लाचारांच्या फौजा निर्माण होणार नाहीत. मग एकदा का लाचारांच्या फौजांची उत्पत्ती थांबली तर समाजाचे कल्याण होण्यास थोडाही वेळ लागणार नाही. कारण लाचारांच्या फौजा निर्माण झाल्यानेच मनुवादी व्यवस्थेचा खेळ सुरू आहे. तो विषमतावादी खेळ मोडण्यासाठी विनोद सदावर्ते यांचे हे पुस्तक शस्त्राची भूमिका निभावेल हे मात्र नक्की.

'भिमाच्या रथाचे सारथी आणि स्वार्थी!' हे पुस्तक स्वतःला स्वतःचे आत्मपरिक्षण करायला भाग पाडणारे पुस्तक आहे असे मत सुमेद घनबहादुर यांनी आपल्या प्रस्तावणेत व्यक्त केले आहे. घनबहादुर यांचे मत रास्त आणि योग्य आहे हे पुस्तक वाचल्यानंतर पुन्हा एकदा स्पष्ट होते. तसेच 'भिमाच्या रथाचे सारथी आणि स्वार्थी' या पुस्तकात जी मांडणी केली आहे. ती लाचारांना सुध्दा विचार करायला भाग पाडणारी आहे. कारण आज हल्ली गल्लोगली लाचारांच्या फौजा मोठ्या प्रमाणात उदयास येत असताना त्यांना हा भिमविचार समजून सांगणे म्हणजे तारेवरची कसरतच म्हणावी लागेल, असे प्रकाशकांनी म्हटले आहे.' त्याशिवाय या पुस्तकासाठी विकास वाघमारे हे आपल्या अभिप्रायात म्हणतात की, 'मी अथंग प्रयासाणे अखंड कष्टाने आणलेला हा रथ माझ्यानंतर तुम्हाला पुढे घेऊन जाता आला तर जा नसता आहे तिथेच राहुद्या किमान मागे तरी खेचु नका, असे डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते.' मग काय आपण आज डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या रथाचे सारथी आहोत का. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आणलेला हा बहुजन समाजाच्या कल्याणाचा रथ याला पुढे नेण्याची जबाबदारी ही डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी तुम्हा आम्हावर सोपवली होती काय आपण तो रथ पुढे घेऊन जाण्यासाठी कार्य करत आहोत? असा प्रश्न विचारला आहे.' या प्रश्नांचे उत्तर भिम के लगते जिगर आधे इधर तो आधे उधर या गाण्यावर कपडे फाटेपर्यंत डान्स करणारे लोक देण्याचा प्रयत्न कधीही करणार नाहीत. अशा लोकांना खरा भिमविचार समजून सांगण्यासाठी लेखक सदावर्ते यांनी केलेला हा पुस्तकरूपी प्रयत्न नक्कीच यशस्वी ठरेल यात तिळमात्र शंका नाही. लेखकाने या पुस्तकातील 'समाजाचं काय रं गड्या...?' या प्रकरणात म्हटले आहे की, 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची चळवळ व विचार अजुनही लोकांना कळाली नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव केवळ प्रसिद्धी मिळवण्यासाठी, चमकेगिरी करण्यासाठी व स्वतःची झोळी भरण्यासाठी घेतले जाते हे वास्तव आहे. जयभीम बोलताना, बाबासाहेबांचे कार्य सांगताना अगोदर स्वतः त्यानुसार वागता आले पाहिजे तोच खरा अनुयायी. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सोबत असलेले लोक गरिब होते, अशिक्षित होते परंतू इमानदार व मनाने मोठे होते. आज डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुळे अनेक जन शिकले, पैसा घर कमावुन आर्थिक श्रीमंत झाले परंतु मनाने व विचाराने अजूनही भिकारी आहेत.' अशी वास्तववादी मांडणी करून लेखकाने आपल्यातील लाचारांविरोधात मोठे बंडच केले म्हणावे लागेल. कारण सत्य मांडताना असत्यावर बोट ठेऊन ते अधोरेखित करावेच लागते. ते काम लेखकाने चोखपणे पार पाडले आहे. कारण संत तुकोबांनी सुध्दा आपल्या अंभगागत म्हटले आहे की, 'सत्य असत्याशी मन केले ग्वाही मानियले नाही बहुमता.'

'भिमजयंती आली की हंगामी आंबेडकरवादी जागृत होतात आणि भिमजयंती धुमधडाक्यात साजरी करण्याचे नियोजन करतात. जयंती धुमधडाक्यात साजरी करायची म्हणजे काय तर समाजातुन वर्गणीच्या नावाने पैसा गोळा करायचा, मोठ मोठे बॅनर लावायचे, मिरवणुकीत डीजे लावायचा, मद्यपान करून मनसोक्त नाचायचे. मिरवणुकीत घसा कोरडा होईपर्यत जयघोष करायचा, मानुस माणसा पासून दुर जाईल असे नारे द्यायचे हिच धुमधडाक्यात जयंती. काही काही ठिकाणी तर वैचारिक जयंतीच्या नावाखाली गाण्याचा, भाषणाचा कार्यक्रम ठेवायचा, ज्यातून केवळ मनोरंजन आणि चुकीचे बाबासाहेब सांगुन बाबासाहेब आंबेडकर यांना संकुचित करून पैशाचे मोठे पाकीट घेऊन स्वतःचा धंदा मात्र मोठा करायचा याला म्हणायचे धुमधडाक्यात जयंती साजरी करणे, असे मत लेखकाने या पुस्तकातील 'भिमजयंती.... भिमाचे विचार किती?' या प्रकरणात म्हटले आहे. हे हंगामी आंबेडकरवादी लोकांना रूचेल असे वाटत नाही. परंतू त्यापुढे लेखक म्हणतात की, 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार चळवळ केवळ भाषणात आहे, भाषण देऊन राशन मिळवणारे लोक बाबासाहेब सांगायचे पाच आकडी सहा आकडी रक्कम घेतात त्यातही चुकीचे बाबासाहेब सांगतात, गायक लोकही कमी नाहीत. रक्तात भिम शोधायला लावतात, लोकांना भावनिक करतात, लोक भावनिक झाले म्हणजे दुकानदारी चालते. रक्तात भिम शोधता शोधता विचारातील भिम गायब होत आहे याचे भानच राहिले नाही. विचारातील भिम गायब होणे हे अधोगती, गुलामगिरी व लाचारीचे लक्षण आहे. म्हणून जयंती साजरी करत असताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे खरे विचार पेरणे, बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचे आचाराचे किती लोक आहेत? ते निर्माण कसे करायचे? समाजातील पैसा खर्च कोठे करायचा या सर्व गोष्टी वर विचारमंथन होऊन जागृतीचा व परिवर्तनाचा जल्लोष सर्वसामान्य मानसापर्यंत पोहचला तरच भिमजयंती धूमधडाक्यात साजरी झाल्याचे सार्थक होईल.' ज्यांचा गल्ला भाषण आणि गाणी गाण्यावर ज्यांचा गल्ला भरतो ते लेखकाने दिलेला सल्ला कदापीही मान्य करणार नाहीत.

परंतू लेकखाने मांडलेले मत जनहितार्थ आहे असे म्हटले तरी ते चुकीचे ठरणार नाही. कारण 'बाबासाहेबांनी दिक्षा दिली, आपण बौद्ध कधी होणार?' या प्रकरणात लेखकाने जी मांडणी केले आहे ती वास्तववादी आहे. ते म्हणतात की, 'बरेच लोक म्हणतात आम्ही १४ ऑक्टोबर १९५६ ला बौद्ध झालो. पण वास्तविकपणे पाहिले तर २०२५ मध्येही आम्ही बौद्ध आहोत का? याची मिमांसा होणे गरजेचे आहे. हा बावना तो शहाना काय प्रकार आहे हा? पोटजाती बघून श्रेष्ठत्व किंवा पोटजाती बघून प्राधान्य देणारा व्यक्ती बौद्ध असुच शकत नाही. मग घरात घरावर, गाडी मध्ये किती मोठा फोटो, मुर्ती लावू दे तो बौद्ध होऊच शकत नाही. दरवर्षी विजया दशमी एका ठिकाणी येऊन वेगवेगळ्याा स्टेजवर साजरी होत असेल तर आम्ही विजय नेमका कशाचा साजरा करतोय? धम्म स्विकारण्याचा उद्देश साध्य झाला का? असा प्रश्न लेखकाने उपस्थित करून पुढे म्हटले की, 'आंबेडकर यांनी दूरदृष्टी ठेवून धम्माची वाट आम्हाला दिली. आम्ही धम्माच्या वाटेने न जाता भलत्याच वाटेने जाऊन धम्मा मध्ये भेसळ करण्याचा प्रयत्न करत आहोत. कोणताही दिवस साजरा करताना त्या दिवसाचे महत्त्व समजून घेऊन त्यावर चिंतन मनन करून भविष्यात अजून काय नियोजन व परिवर्तन आवश्यक आहे यावर चर्चा व्हायला पाहिजे. पण सध्या जो तो येउन भाषण देऊन निघून जातो यामुळे ना चळवळ वाढत ना परिवर्तन होत.' याचा विचार केला तर समाजाचे कल्याण होईल आणि भिमाचा वैचारिक रथ पुढे जाण्यास मदत होईल. लेखकाने आपल्या 'भिमाच्या रथाचे सारथी आणि स्वार्थी!' या पुस्तकातून अनेक विषयांचे मुद्देसुद आणि तर्कसंगत विश्लेषण केले आहे. हे पुस्तक ज्यादिवशी प्रत्येकाच्या घरात आणि घरातील प्रत्येक माणसाच्या हाती पडेल त्यादिवशी स्वार्थी लोकांची कोंडी होण्यास जरासाही वेळ लागणार नाही. कारण लेखक म्हणतात की, 'स्वतःला गुणवंत व आभ्यासु, ज्ञानी समजणा-यांना अजून संविधानाचे महत्त्व व गांभीर्य कळत नसेल तर त्याला गुणवंत वा शिक्षीत कसे म्हणावे. हजारो वर्षांपासून गुलामीत खितपत पडलेल्या लोकांना माणसात आणणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर एका जातीचे उद्धाते आणि संविधान एका जातीची संपती असे वाटत असेल तर अशा विचारांच्या लोकांना कोणत्या शब्दात बोलुन त्यांचा सन्मान करावा? डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी माणसाला माणसात आणुन माणसिक गुलामीतुन मुक्त केले तरीही लोकांना संविधान व डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे कळत नसतील तर त्यांच्या बुद्धीची किव येते.' त्यामुळे 'भिमाच्या रथाचे सारथी आणि स्वार्थी!' हे पुस्तक प्रत्येकाने इतरापर्यंत पोहोच करण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न केले तर जनसामन्यांचे कल्याण होईल. कारण डॉ. बाबासाहेबांचा मानवतावादी लोककल्याणकारी विचारच माणसांचे भले करू शकतो. त्यामुळे तो विचार प्रत्येकाच्या मस्तकात घालण्याचे काम भिमाच्या रथाचे सारथी असलेल्या प्रत्येकजण करील ही अपेक्षा आहे.




**पुस्तकाचे नाव : भिमाच्या रथाचे सारथी आणि स्वार्थी!**
**लेखक : विनोद पंजाबराव सदावर्ते**
**मो. ९१३०९७९३००**
**प्रस्तावणा : सुमेद घनबहादुर, अकोला**
**प्रकाशक: सतिश प्रघणे, पुणे**
**प्रकाशक : रुक्माई प्रकाशन, अंजनडोह (बीड)**
**पृष्ठे : १७६ /मुल्य : २५० रूपये**

# वारी बंधुता आणि मानवतेचे महासंमेलन

जगाला लुभावणारी पंढरपुरातील विठुरायाची आषाढी वारी ही मानवी शुद्धतेचे सर्वात मोठे माध्यम आहे. पंढरीच्या विठुरायाच्या वारीची परंपरा शेकडो वर्षांपासून चालत आली आहे. आजपर्यंत समस्तजनांनी, वैष्णवांनी पंढरपूरची पायी वारी केली आहे. पुंडलिकाच्या भक्तीला महत्व देऊन भगवान विठ्ठल आजही विटेवरी उभे आहेत. अशा आख्यायिका आपण ऐकल्या असतील. म्हणजेच शुद्ध भक्तिभाव भगवतांना प्रिय आहे. म्हणूनच विठ्ठल हा सर्व भाविक वैष्णवांचा भगवंत आहे. आजपर्यंत संतांनी मानवाच्या कल्याणासाठी, सलोख्यासाठी आणि विश्वशांतीसाठी मानवतेचा मार्ग सांगितला आहे. आज जगाचा विनाश करू पाहणाऱ्या युद्धाच्या काळात विश्वबंधुता आणि विश्वशांतीसाठी सर्व देशांनी जागतिक स्तरावर एकत्र येणे आवश्यक झाले आहे. अशा वेळी जगाच्या पाठीवर लाखो लोकांना एकत्र जोडणारी ही पंढरीची वारी असल्याने, या वारीला आपण बंधुता आणि मानवतेचे महासंमेलन संबोधू शकतो.




माणसे थोडीफार जास्त शिकली की ती अहंकारी होण्याची शक्यता अधिक असते. ज्ञान लोकांना अहंकारी बनवत नाही. पण ज्ञानामुळे आलेला कथित मोठेपणा हा मानवाला अहंकार देऊन जातो. अहंकार माणसाला शेवटी विनाशाकडे घेऊन जाणारा असतो. विठुरायाच्या वारीमध्ये मात्र सर्व वैष्णव गोपाळ ज्ञान, अज्ञान, मोठेपणा, अहंकार सर्व बाजूला ठेऊन केवळ शुध्द भक्तिभावाने वारकरी म्हणून आलेले असतात.

जे का रंजले गांजले ।  
त्याशी म्हणे जो आपुले ।।  
तोचि साधू ओळखावा ।  
देव तेथेची जाणावा ।।

रंजल्या गांजल्यांना आपलंसं करून त्यांचा पालनहार करणारा हा विठोबा सामाजिक न्यायाचे खरे प्रतिक आहे. वारी भेदभाव करत नाही. माणसातील भेद - खेद समूळ नष्ट व्हावा, याचा विचार आणि आचार वारी देत राहते. वारी माणसा माणसांना जोडणारा मानवतेचा दुवा प्रवाहित करते. आज भारतीय संत साहित्याचा अगाध महिमा आणि विश्वात्मके पसायदानाची ही संस्कृती केवळ पंढरीच्या याच ज्ञानवारीमुळे टिकून राहिली आहे. पायी चालत देवाला भेटायला जाताना सर्वजण एकमेकांना बंधूभावाची वागणूक देतात. या वारीमध्ये प्रत्येक वारकरी हा एकमेकांसाठी भगवंत म्हणजेच माऊली झालेला असतो.

या रे या लहान थोर ।  
याती भलते नारी नर ।।



ही समतेची दिंडी असते. लहान - थोर, नारी - नर असा कोणताच भेदभाव न करता सर्वजन हरिनामाचा गजर करता वारीच्या रिंगणात समता दर्शवतात.

अशा प्रकारे समता, समानता, बंधुता, आदर, स्नेह, प्रेम, भक्तिभाव, सामाजिक ऐक्य, एकात्मता आणि सलोख्यासाठी आवश्यक असणाऱ्या मानवी मूल्यांचे दर्शन याच पंढरीच्या वारीत होते. एकमेकांच्या चरणांचे दर्शन घेऊन या वारीमध्ये मानवी आदर आणि उदारता जगायला मिळते. म्हणूनच विश्वशांतीसाठी आवश्यक असणारा मानवतेचा एकमेव महामार्ग म्हणजेच पंढरीची वारी होय.

**- विक्रम मालन आप्पासो शिंदे**  
**कवी, लेखक, साहित्यिक**  
**७७४३८८४३०७**

# ऐन पावसाळ्यात उन्हाचा तडाखा... निसर्गाचा धोक्याचा इशारा!

## पर्यावरण ऱ्हास, जंगलतोड आणि हवामान बदलामुळे महाराष्ट्रातील विशेषतः मराठवाड्यावर उष्णतेचे संकट

पावसाळा म्हटला की काळे ढग, रिमझिम सरी, आल्हाददायक वातावरण आणि हिरवागार निसर्ग हे चित्र डोळ्यांसमोर उभे राहते. मात्र यंदा महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये, विशेषतः मराठवाड्यात, याच्या नेमक्या उलट परिस्थिती अनुभवायला मिळत आहे. पावसाऐवजी प्रखर ऊन, वाढते तापमान आणि लांबलेला पावसाचा खंड यामुळे जनजीवन अक्षरशः होरपळून निघत आहे. ऐन पावसाळ्यात उन्हाळ्याची तीव्रता जाणवत असल्याने नागरिक, शेतकरी आणि पर्यावरण अभ्यासकांमध्ये गंभीर चिंता व्यक्त होत आहे.




ही केवळ हवामानातील तात्पुरती विसंगती नसून, पर्यावरण ऱ्हास आणि हवामान बदलाचा हा स्पष्ट इशारा आहे. गेल्या काही दशकांत झालेली मोठ्या प्रमाणातील जंगलतोड, अनियंत्रित शहरीकरण, नैसर्गिक संसाधनांचा वाढता वापर आणि जागतिक तापमानवाढ यामुळे निसर्गाचे संतुलन बिघडले असून त्याचे परिणाम आता थेट आपल्या दैनंदिन जीवनावर दिसू लागले आहेत.

दुष्काळाच्या झळा सातत्याने सहन करणारा मराठवाडा यंदाही या बदलाचा सर्वाधिक फटका बसलेला प्रदेश ठरत आहे. हंगामाच्या सुरुवातीला झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने पेरण्या पूर्ण केल्या. मात्र त्यानंतर पावसाने दडी मारल्याने आणि उन्हाची तीव्रता वाढल्याने जमिनीतील ओलावा झपाट्याने कमी झाला आहे. उगवलेली पिके करपू लागली असून उत्पादन घटण्याची आणि आर्थिक नुकसान होण्याची भीती शेतकऱ्यांमध्ये वाढत आहे.

या परिस्थितीमागील सर्वात मोठे कारण म्हणजे जंगलतोड. वृक्ष तापमान नियंत्रित ठेवतात, जमिनीतील आर्द्रता टिकवून ठेवतात आणि वातावरणातील जलचक्र सुरळीत ठेवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. परंतु मोठ्या प्रमाणावर झाडांची कत्तल झाल्याने जमिनीवरील उष्णता वाढत आहे, पावसाचे स्वरूप बदलत आहे आणि स्थानिक हवामान अधिक अस्थिर होत आहे.

यासोबतच वाढते शहरीकरणही या संकटाला कारणीभूत ठरत आहे. शहरांमधील काँक्रीटची जंगले, डांबरी रस्ते आणि वाढती बांधकामे उष्णता साठवून ठेवतात. त्यामुळे अर्बन हीट आयलंडची समस्या निर्माण होत असून शहरांतील तापमान ग्रामीण भागाच्या तुलनेत अधिक वाढत आहे. दुसरीकडे, जमिनीचे काँक्रीटीकरण झाल्याने पावसाचे पाणी जमिनीत मुरत नाही. परिणामी भूजल पातळी खालावत असून भविष्यातील जलसंकट अधिक गंभीर बनत आहे.


हवामान बदलामुळे मान्सूनचे स्वरूपही झपाट्याने बदलत आहे. पूर्वी अनेक दिवस सातत्याने पडणारा पाऊस आता काही तासांत मुसळधार कोसळतो आणि त्यानंतर अनेक दिवस पावसाचा खंड पडतो. अशा अनियमित पर्जन्यमानामुळे शेती, जलव्यवस्थापन आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम होत आहे.

या परिस्थितीचा फटका केवळ शेतीपुरता मर्यादित नाही. धरणांमधील पाणीसाठा अपेक्षेप्रमाणे वाढत नाही, पिण्याच्या पाण्याचे संकट गडद होते, उष्णतेमुळे वीजेची मागणी वाढते, तसेच लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि दिवसभर उन्हात काम करणाऱ्या मजुरांवर उष्माघातासारख्या आजारांचा धोका वाढतो. वन्यजीव आणि जैवविविधतेवरही याचे गंभीर परिणाम होत असून पाणवठे आटल्याने त्यांच्या अस्तित्वालाही धोका निर्माण झाला आहे.

या संकटावर मात करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे पर्यावरणाचे संतुलन पुन्हा प्रस्थापित करणे. मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन, जंगलांचे संरक्षण, नद्या व जलाशयांचे पुनरुज्जीवन, पावसाच्या पाण्याचे संकलन, भूजल पुनर्भरण आणि पर्यावरणपूरक शहरी नियोजन यावर तातडीने भर देण्याची गरज आहे. त्याचबरोबर शेतकऱ्यांना हवामान बदलाशी सुसंगत शेतीपद्धती, आधुनिक सिंचन व्यवस्था आणि अचूक हवामान माहिती उपलब्ध करून देणेही अत्यावश्यक आहे.

पर्यावरण संवर्धन ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करणे, पाण्याची बचत करणे, प्रदूषण कमी करणे, प्लास्टिकचा वापर टाळणे आणि पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे ही काळाची गरज आहे.

ऐन पावसाळ्यात जाणवणारी प्रखर उष्णता ही केवळ हवामानातील विसंगती नाही; ती निसर्गाने दिलेली गंभीर चेतावणी आहे. आज पर्यावरणाचे संरक्षण केले नाही, तर भविष्यात अशा टोकाच्या हवामान घटना आपल्या जीवनाचा कायमस्वरूपी भाग बनू शकतात. पुढील पिढ्यांना सुरक्षित, हिरवेगार आणि समृद्ध भविष्य द्यायचे असेल, तर पर्यावरण संवर्धनाचा संकल्प आज आणि आत्ताच करावा लागेल.



**प्रा. योगेश शर्मा**  
**(कार्यक्रमाधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर)**

# नाव कमावणं कठीण, पण गमावणं क्षणाचं!

# आयुष्यभराच्या प्रतिमेला एका चुकीची किंमत

आयुष्यभर नाव कमावलं आणि म्हातारपणी गमावलं, अशी गत झाली ह्या माणसाची. हे वाक्य केवळ एका व्यक्तीच्या आयुष्याचं वर्णन नाही, तर सार्वजनिक जीवन जगणाऱ्या प्रत्येकासाठी एक गंभीर इशारा आहे. नेता, अधिकारी, साहित्यिक, कलाकार, समाजसेवक किंवा कोणतीही सार्वजनिक व्यक्ती असो, आयुष्यभराच्या कष्टाने निर्माण झालेली प्रतिमा, लोकांचा विश्वास आणि समाजाचा आदर एका चुकीच्या निर्णयामुळे क्षणार्धात कोसळू शकतो. प्रतिष्ठा उभारण्यासाठी अनेक दशके खर्ची पडतात, पण ती गमावण्यासाठी अनेकदा एकच चुकीचं पाऊल पुरेसं ठरतं. आज सामाजिक माध्यमांच्या युगात प्रत्येक व्यक्तीच न्यायाधीश झाली आहे. प्रत्येक कृतीचं विश्लेषण होतं, प्रत्येक विधानाचं परीक्षण होतं आणि प्रत्येक निर्णयावर लोकमत तयार होतं. त्यामुळे सार्वजनिक जीवनातील प्रत्येक शब्द आणि प्रत्येक कृती अधिक जबाबदारीने करावी लागते. आयुष्यभर जपलेली विश्वासार्हता शेवटच्या टप्प्यावर मलीन होऊ नये, यासाठी विवेक, संयम आणि नैतिकता हेच सर्वात मोठे आधारस्तंभ ठरतात.



जीवनात यशस्वी होण्यासाठी केवळ बुद्धिमत्ता किंवा प्रतिभा पुरेशी नसते, तर त्यासाठी चारित्र्याची साथही तितकीच आवश्यक असते. पैसा, पद, सत्ता किंवा प्रसिद्धी माणसाला मोठं करत नाहीत, त्याच्या निर्णयातील प्रामाणिकपणा, मूल्यांप्रती असलेली निष्ठा आणि समाजाविषयीची जबाबदारी त्याचं खरं मोठेपण सिद्ध करतात. म्हणूनच इतिहासात अनेक व्यक्ती त्यांच्या कर्तृत्वाइतक्याच त्यांच्या अखेरच्या चुकीमुळेही लक्षात राहिल्या आहेत. म्हातारपण हे अनुभव, शहाणपण आणि मार्गदर्शनाचं वय मानलं जातं. या वयात समाजाला दिशा देण्याची अपेक्षा असते. परंतु जर याच टप्प्यावर अहंकार, स्वार्थ, सत्तेची लालसा किंवा चुकीच्या लोकांची संगत माणसाला भरकटवत असेल, तर त्याने आयुष्यभर कमावलेली विश्वासार्हता एका क्षणात धुळीस मिळते. म्हणूनच म्हणतात, उतारवयातील संयम हा आयुष्यभराच्या कर्तृत्वाचा खरा रक्षक असतो.

आज अनेक क्षेत्रांत अशी उदाहरणे पाहायला मिळतात. काही राजकारणी आयुष्यभर जनतेसाठी काम करतात, पण शेवटच्या काळात सत्तेच्या मोहापायी तत्त्वांशी तडजोड करतात. काही अधिकारी प्रामाणिक सेवेनंतर निवृत्तीच्या उंबरठ्यावर भ्रष्टाचाराच्या आरोपात अडकतात. काही साहित्यिक किंवा समाजसुधारक स्वतःच्या विचारांशी विसंगत भूमिका घेतात आणि त्यांच्या चाहत्यांचाच विश्वास गमावतात. समाज त्यांच्या आयुष्यभराच्या योगदानाचा विसर पडू देत नाही, मात्र त्यांच्या शेवटच्या चुकीची सावली त्यांच्या संपूर्ण कर्तृत्वावर पडते. चुका होणं मानवी स्वभावाचा भाग आहे. मात्र चूक मान्य करण्याचं धैर्य आणि स्वतःमध्ये सुधारणा करण्याची तयारी हेच खऱ्या मोठेपणाचं लक्षण आहे. प्रतिष्ठा टिकवायची असेल तर सतत आत्मपरीक्षण आवश्यक आहे. स्वतःभोवती केवळ स्तुती करणारी माणसं गोळा करणारा व्यक्ती वास्तवापासून दूर जातो. टीका स्वीकारण्याची वृत्ती आणि आवश्यक तेव्हा नम्रपणे माघार घेण्याची तयारीच दीर्घकाळ सन्मान टिकवून ठेवते.

समाजानेही व्यक्तीचं मूल्यमापन करताना संतुलित भूमिका घ्यायला हवी. एका चुकीमुळे संपूर्ण आयुष्य नाकारण्याची घाई योग्य नाही. एखाद्या व्यक्तीच्या संपूर्ण योगदानाचा, परिस्थितीचा आणि भूमिकेचाही विचार व्हायला हवा. पण त्याचवेळी कोणतीही चूक केवळ व्यक्ती मोठी आहे म्हणून दुर्लक्षितही होता कामा नये. नैतिकतेचं माप सर्वांसाठी समान असलं पाहिजे. आजच्या तरुण पिढीनेही या वास्तवातून महत्त्वाचा धडा घ्यायला हवा. करिअर, पैसा आणि प्रसिद्धी मिळवणं आवश्यक आहे; पण त्याहून महत्त्वाचं म्हणजे विश्वास कमावणं. विश्वास हा बँकेतील ठेवीसारखा असतो, वर्षानुवर्षे जमा करावा लागतो पण एका चुकीच्या व्यवहाराने क्षणात संपतो. म्हणून प्रत्येक निर्णय घेताना त्याचा आपल्या प्रतिमेवर आणि भविष्यातील विश्वासावर काय परिणाम होईल, याचाही विचार व्हायला हवा.

सार्वजनिक जीवनातील व्यक्तींनी विशेषतः लक्षात ठेवावं की त्यांचं प्रत्येक पाऊल समाजासाठी संदेश ठरत असतं. त्यांची वाणी, वर्तन आणि निर्णय यावर अनेकांची श्रद्धा असते. त्यामुळे वैयक्तिक लाभापेक्षा सार्वजनिक विश्वास अधिक मौल्यवान असतो. एकदा हा विश्वास तुटला, तर कोणतंही पद, कोणतीही सत्ता किंवा कोणतीही संपत्ती त्या नुकसानीची भरपाई करू शकत नाही. माणसाचं खरं यश त्याने किती संपत्ती कमावली यावर ठरत नाही, तर त्याने किती चांगल्या आठवणी मागे ठेवल्या, किती स्वच्छ प्रतिमा निर्माण केली आणि किती माणसं आपल्या कर्तृत्वाने जोडली यावर ठरतं. आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यावर लोकांनी हा माणूस शेवटपर्यंत तत्त्वांशी प्रामाणिक राहिला, असं म्हणणं हीच सर्वात मोठी कमाई असते.



आज समाजाला पदापेक्षा प्रामाणिकपणा, प्रसिद्धीपेक्षा विश्वास आणि यशापेक्षा चारित्र्य जपणारी माणसं हवी आहेत. कारण नाव कमावणं हे परिश्रमाचं फळ असतं, पण नाव टिकवणं ही आयुष्यभराची तपश्चर्या असते. प्रतिष्ठा हा मुकुट नसतो की हवा तसा घालता किंवा काढता येईल, ती आरशासारखी असते. एकदा तडा गेला की प्रतिबिंब कायमच बदलून जातं. काळ कोणालाही माफ करत नाही. तो प्रत्येकाच्या कर्तृत्वाची नोंद ठेवतो आणि प्रत्येक चुकीचाही हिशोब मांडतो. त्यामुळे आयुष्यभर जपलेली प्रतिमा शेवटच्या श्वासापर्यंत तितक्याच प्रामाणिकपणे जपावी लागते. इतिहास माणसाच्या संपत्तीची नव्हे, तर त्याच्या चारित्र्याची साक्ष देतो. सत्ता, संपत्ती आणि प्रसिद्धी क्षणभंगुर असतात, पण सचोटी, मूल्यनिष्ठा आणि समाजाच्या मनात निर्माण झालेला विश्वास हेच माणसाच्या आयुष्याचं खरं भांडवल असतं.

आज प्रत्येक सार्वजनिक व्यक्तीने स्वतःला एक प्रश्न विचारण्याची गरज आहे. आपण पदासाठी जगतो आहोत की प्रतिष्ठेसाठी? कारण पद निवृत्तीनंतर संपतं, पण प्रतिष्ठा पिढ्यान्पिढ्या जिवंत राहते. आयुष्याच्या संध्याकाळी मागे वळून पाहताना संपत्तीपेक्षा सन्मान, पदापेक्षा प्रतिष्ठा आणि लोकप्रियतेपेक्षा लोकांचा विश्वासच अधिक मौल्यवान वाटतो. म्हणून प्रत्येक कृती, प्रत्येक निर्णय आणि प्रत्येक शब्द हा आपल्या चारित्र्याचा आरसा असला पाहिजे. शेवटी एकच "नाव कमावण्यासाठी आयुष्य खर्ची पडतं, पण नाव गमावण्यासाठी एक क्षण पुरेसा असतो". त्यामुळे कर्तृत्वापेक्षा चारित्र्य मोठं आणि प्रसिद्धीपेक्षा विश्वास अधिक मौल्यवान असतो. कारण इतिहास यशस्वी माणसांची नव्हे, तर विश्वासार्ह माणसांचीच कायम आठवण ठेवतो.

**प्रविण बागडे**  
नागपूर/मो. ९९२३६२०९१९

## समाज निर्भीड व संविधानिक अधिकाऱ्याच्या पाठीशी...!- समाजभूषण उत्तमराव तरकसे



**सांगली/प्रतिनिधी :** सांगली येथील क्रांतिसिंह नाना पाटील या सभागृहात समाजभूषण उत्तमराव तरकसे सामाजिक व शैक्षणिक प्रतिष्ठान आंबेजोगाई तालुका आंबेजोगाई जिल्हा बीड या संस्थेच्या यांच्यावतीने समाज निर्भीड व संविधानिक अधिकाऱ्यांच्या पाठीशी या सदराखाली समाजभूषण उत्तमराव दासू तरकसे असरडोहकर (महाराष्ट्र शासनाच्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ साहित्यिक कवी विचारवंत व करपली भाकरकार ) यांचा परिसंवाद आयोजित करण्यात आला होता सदर परिसरवादामध्ये आयएएस तुकाराम मुंडे साहेब यांच्यावर त्यांनी आपले विचार मांडले

तुकाराम मुंढे यांच्यासारखा अधिकारी कितीही प्रामाणिक, कर्तव्यदक्ष आणि धाडसी असला तरी त्याच्या पाठीशी उभे राहणे आपल्याला सहज शक्य नाही... कारण आपल्या रक्तातच खाबूगिरी भिनली आहे! २० लाखांची गाडी घेऊन ५० रुपयांचा टोल वाचवण्यासाठी धडपडणारे आपण..... १ कोटीचा फ्लॅट घेऊन सोसायटीचा ५०० रुपयांचा मेंटेनन्स वाढला तर आंदोलन करणारे आपण... हॉटेलमध्ये ५००० रुपयांचे बिल देणारे, पण जीएसटी टाळण्यासाठी ''कॅशमध्ये चालेल का?'' विचारणारे

## डॉक्टर पतीची हत्या, पत्नी मृतदेहाजवळ मोबाईल स्क्रोल करत होती

धारवाड : कर्नाटकमधील धारवाडमध्ये एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. ४५ वर्षीय डॉक्टर किरण होनन्नवार हे त्यांच्या घरात रक्ताच्या थारोळ्यात मृत्युमुखी पडलेले आढळून आले. त्यांची पत्नी डॉ. प्रियांकानेच त्यांची हत्या केल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. तसेच डॉक्टर दाम्पत्याच्या आठ वर्षांच्या मुलावरही धारदार शस्त्राने वार करण्यात आले असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मात्र त्याची प्रकृती गंभीर असल्याचे सांगितले जाते.

शेजाऱ्यांनी या घटनेची माहिती पोलिसांना दिल्यानंतर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. डॉ. होनन्नवार यांच्या घराचे दार उघडले असता आतमध्ये रक्ताचा सडा आढळून आला. हुबळी-धारवाडचे पोलीस आयुक्त एन. शशिकुमार हेही घटनास्थळी आले होते. त्यांच्या लक्षात आले की, आठ वर्षांच्या मुलाचा श्वास सुरू होता. त्यांनी तातडीने मुलाला उचलून रुग्णालयात उपचारासाठी पाठवले.

पोलिसांमधील सूत्रांनी काही माध्यमांना दिलेल्या माहितीनुसार, डॉ. किरण यांचे नातेवाईक आणि मित्र मंगळवारी रात्री आणि बुधवारी सकाळी त्यांना वारंवार फोन करत होते. मात्र प्रत्येक वेळी डॉ. प्रियांका फोन उचलत होत्या. रात्री त्यांनी सांगितले की, किरण आराम करत आहेत. तसेच सकाळी फोन उचलून त्या म्हणाल्या की, डॉ. किरण ड्युटीवर गेले आहेत.

अखेर डॉ. किरण यांचे कुटुंबीय बुधवारी सायंकाळी थेट दाम्पत्याच्या घरी धडकले. तेव्हा किरण आणि मुलगा रक्ताच्या थारोळ्यात पडल्याचे त्यांना दिसले. त्यावेळी डॉ. प्रियांका बेडवर पडून मोबाइल स्क्रोलिंग करत होत्या. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

## कच्छी समाजाशी नातं हे कुटुंबासारखंच; ठाण्याच्या विकासासाठी शासन कटिबद्ध – उपमुख्यमंत्री शिंदे

**ठाणे/प्रतिनिधी :** कच्छी अस्मिता मंचतर्फे आयोजित 'कच्छी पगडी कोणशिरे' या गौरव सोहळ्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कच्छी समाजाशी असलेले आपले जिव्हाळ्याचे आणि कौटुंबिक नाते अधोरेखित करत ठाण्याच्या सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध असल्याचे स्पष्ट केले. समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा गौरव करणारा हा उपक्रम गेली १९ वर्षे सातत्याने सुरू असून, प्रत्येक वर्षी या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे भाग्य लाभल्याचे त्यांनी सांगितले.

''ज्या भावनेने आपण घरातील कार्यक्रमाला उपस्थित राहतो, त्याच भावनेतून मी या कार्यक्रमाला दरवर्षी येतो. समाजातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्यांचा सन्मान केल्याने इतरांनाही प्रेरणा मिळते आणि समाजाचा विकास अधिक वेगाने होतो,'' असे शिंदे म्हणाले. यावेळी पुरस्कारासाठी निवड झालेल्या एका ४० वर्षीय तरुणाच्या हृदयविकाराच्या झटक्याने झालेल्या निधनाबद्दल त्यांनी शोक व्यक्त करत श्रद्धांजली अर्पण केली. कार्यक्रमाचे प्रमुख संयोजक सुरेश गडा यांच्या समाजसेवेचे कौतुक करताना शिंदे म्हणाले, ''धर्मवीर आनंद दिघे यांचे निष्ठावान शिवसैनिक म्हणून सुरेश गडा यांचे नाव कायम आदराने घेतले जाईल.'' त्यांनी हिंदीतही भावना व्यक्त करत, ''चालीस साल से शिवसेना के साथ खत्रडा, उसका नाम है सुरेश गडा,'' असे गौरवोद्गार काढले.

आषाढी बीज हा कच्छी समाजाचा नववर्षाचा सण असल्याचे सांगत उपमुख्यमंत्र्यांनी सर्व समाजबांधवांना शुभेच्छा दिल्या. मराठी समाजासाठी जसा गुढीपाडवा महत्त्वाचा आहे, तसाच कच्छी समाजासाठी आषाढी बीज हा नववर्षाचा प्रारंभ असल्याचे त्यांनी नमूद केले. ठाण्यात विकासकामांचा वेग वाढणार :

ठाण्यात सुरू असलेल्या विकासकामांची माहिती देताना शिंदे यांनी मेट्रो, अंतर्गत मेट्रो, कोस्टल रोड, डबल डेकर रस्ते आणि इतर महत्त्वाकांक्षी प्रकल्पांमुळे शहराचा चेहरामोहरा बदलत असल्याचे सांगितले. अहमदाबाद-घोडबंदर मार्गावरील वाहतूक कोस्टल रोडमार्गे मुंबईकडे वळवल्यानंतर ठाण्याची वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## व्ही एस पँथर्स युवा संघटनेच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश




**चाकूर/प्रतिनिधी :** चाकुर येथील मागासवर्गीय विद्यार्थी वसतिगृहाचे नाव बदलून डॉ बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थी वस्तीगृह करण्यात आले व्ही एस पँथर्स युवा संघटनेचे सं अध्यक्ष विनोदभाऊ खटके यांच्या सूचनेनुसार मागासवर्गीय विद्यार्थी वसतिगृहाचे नाव बदलण्यासाठी वारंवार निवेदन,आंदोलन,मोर्चा च्या माध्यमातून जिल्हाध्यक्ष शरद किणीकर यांच्या नेतृत्वाखाली चाकुर चाकूर येथे मोर्चाच्या माध्यमातून मागासवर्गीय विद्यार्थी वस्तीग्रह चे नाव भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थी वस्तीग्रह असे करण्यात यावे अशी मागणी करण्यात आली होती त्या मागणीला मूर्त स्वरूप प्राप्त झाले. या साठी जिल्हाध्यक्ष शरद किनीकर तालुकाध्यक्ष अजय वाघमारे, मार्गदर्शक माधव कांबळे सर, ग्रुप तालुका अध्यक्ष समाधान गायकवाड जिल्हा उपाध्यक्ष कुलदीप कांबळे शहर अध्यक्ष विक्रम कांबळे गजानन कांबळे ,केतन कांबळे ,बंटी भोसले, सिद्धार्थ किणीकर, शादुल शेख, रणवीर कांबळे, महादेव गायकवाड, अनुज कांबळे, मिलिंद कांबळे ,रोहित कांबळे, स्वप्नील गायकवाड, संगम डोंगरे, शैलेश महालिंगे, गजानन गायकवाड व आदी

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना आणि शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी २२ जुलैपर्यंत मुदतवाढ

**लातूर/प्रतिनिधी :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत लातूर जिल्ह्यामध्ये एकूण २६ शासकीय वसतिगृहे कार्यरत आहेत, ज्यामध्ये मुलांची १४ आणि मुलींची १२ वसतिगृहे समाविष्ट आहेत. यापैकी लातूर शहरात मुलांची ६ व मुलींची ४ वसतिगृहे असून औसा, निलंगा, उदगीर, देवणी आणि चाकूर येथे प्रत्येकी मुलांचे १ व मुलींचे १ वसतिगृह सुरू आहे. तसेच अहमदपूर येथे मुलांची २ व मुलींची २, रेणापूर येथे मुलांचे १ आणि जळकोट येथे मुलींचे १ वसतिगृह कार्यरत आहे. या सर्व शासकीय वसतिगृहांची सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाची प्रवेश प्रक्रिया सध्या ऑनलाईन पद्धतीने सुरू असून, इच्छुक विद्यार्थी प्रवेशासाठी https://hmasnew.mahait.org या नवीन लिंकचा वापर करून आपले अर्ज भरू शकतात.

जिल्ह्यात इयत्ता अकरावी व बारावीमध्ये शिक्षण घेणाऱ्या, तसेच बिगर-व्यावसायिक पदवी, पदविका आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना (व्यावसायिक अभ्यासक्रम वगळून) हे प्रवेश अर्ज भरता येतील. तसेच अभ्यासक्रमाच्या मध्यंतरीच्या (मधल्या) वर्षात प्रवेश घेतलेले विद्यार्थीही या प्रवेशासाठी अर्ज करण्यास पात्र आहेत. कनिष्ठ महाविद्यालयीन व बिगर-व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी आता २२ जुलै २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

शासकीय वसतिगृहासाठी अर्ज करणाऱ्या अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील विद्यार्थ्यांना जागेअभावी वसतिगृहात प्रवेश मिळाला नाही, तर अशा पात्र विद्यार्थ्यांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा (निवास व भोजन भत्ता) ऑनलाईन पद्धतीने लाभ दिला जातो. वसतिगृह प्रवेशासाठी निवड न झालेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज परस्पर स्वाधार योजनेसाठी ऑनलाईन वर्ग केले जात असल्याने, ज्या विद्यार्थ्यांनी मूळ वसतिगृह प्रवेशाचा अर्ज भरलेला नाही, अशा विद्यार्थ्यांना स्वाधार योजनेचा स्वतंत्र अर्ज भरण्यासाठी ऑनलाईन प्रणालीत कोणतीही सुविधा उपलब्ध असणार नाही आणि त्यांना या योजनेचा लाभही मिळणार नाही. तरी सर्व पात्र विद्यार्थ्यांनी वरील नवीन वेबलिंकचा वापर करून आणि स्थानिक गृहप्रमुख किंवा गृहपाल यांच्याशी संपर्क साधून आपले प्रवेश अर्ज वेळेत भरावेत, असे आवाहन लातूरचे समाज कल्याण सहायक आयुक्त यादव गायकवाड यांनी केले आहे.

## मोशी कचरा डेपो दुर्घटना : ९ जणांचा गेला जीव; नोटीसवर दिलेलं ते उत्तर वाचून प्रशासन संतापलं, २ अधिकाऱ्यांचं थेट निलंबन

पिंपरी : मोशी कचरा डेपो दुर्घटनेप्रकरणी अखेर पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने अत्यंत कठोर पाऊल उचलले आहे. कर्तव्यात गंभीर निष्काळजीपणा आणि अक्षम्य हलगर्जीपणा केल्याचा ठपका ठेवत मनपा आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी बुधवारी दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांचे तडकाफडकी निलंबन केलं आहे. या धडक कारवाईमुळे महापालिका वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे. महापालिका आयुक्तांच्या आदेशानुसार निलंबित करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांमध्ये संजय कुलकर्णी (मुख्य अभियंता, पर्यावरण विभाग) आणि योगेश आल्हाट (कार्यकारी अभियंता) यांचा समावेश आहे. निलंबनाच्या या कारवाईसोबतच या दोघांचीही विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे. कचरा डेपोच्या दैनंदिन कामकाजाचे पर्यवेक्षण करणे, कचऱ्याच्या ढिगाऱ्यांची स्थिती तपासणे आणि सुरक्षिततेची काटेकोर अंमलबजावणी करणे ही मुख्य अभियंता कुलकर्णी आणि कार्यकारी अभियंता आल्हाट यांची थेट जबाबदारी होती.

# व्ही एस पँथर्स युवा संघटनेचा सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाला जाहीर पाठिंबा

**लातूर/प्रतिनिधी :** येथील व्ही एस पँथर्स युवा संघटनेचे सं अध्यक्ष विनोदभाऊ खटके यांच्या सूचनेनुसार विद्यार्थी आघाडीच्या वतीने लातूर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत निवेदन पाठवून विद्यार्थी हितासाठी देशातील थोर शिक्षण तज्ञ सोनम वांगचुक हे गेल्या अनेक दिवसापासून दिल्ली येथील जंतर-मंतरवर आमरण उपोषणाला बसले आहेत , या निवेदनाद्वारे सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाला जाहीर पाठिंबा व्यक्त करण्यात आला.

तसेच यांनी उपोषण सोडून अन्य लोकशाही मार्गाने आंदोलन करावे अशी विनंती करण्यात आली सरकारने तात्काळ सोनम वांगचुक यांची मागणी पूर्ण करावी अन्यथा व्हीएस पँथर्स विद्यार्थी आघाडीच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल याची गंभीरतेने दखल घेण्यात यावी असा इशारा यावेळी देण्यात आला.

या निवेदनावर विद्यार्थी आघाडी मराठवाडा अध्यक्ष इंजी प्रीतम दंडे विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष स्वप्निल कांबळे जिल्हा उपाध्यक्ष ऋषी ढगे, शहर सचिव रोहित दंडे शहर संघटक रितेश जांभळे शहर उपाध्यक्ष महेश सोनवणे अक्षय गवळी सुबोध महाळंगीकर जिल्हा प्रसिद्ध प्रमुख सुजित कांबळे गायकवाड विशाल कैलास ढगे श्रीकृष्ण बोंदर ओमकार पाटील अनिकेत सितापे आदी पदाधिकारी उपस्थित होते.



## आम्ही सुनेत्रा पवारांना सगळ्या गोष्टी सांगतो, आमच्या पक्षात कुठलाही गैरसमज नाही- तटकरे

**मुंबई/प्रतिनिधी :** आमच्या पक्षात कुठलाही गैरसमज नाही. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाबाबत सध्या ज्या चर्चा सुरू आहेत, त्या चुकीच्या आहेत. शरद पवार गटाचे आमदार जयंत पाटील आणि आमची भेट देखील झालेली नाही, असं राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे म्हणाले. तसेच पक्षात कधी अविश्वास आहे, असं कधी ऐकलं नाही, असंही सुनील तटकरे यांनी स्पष्ट केलं.

अजितदादा असताना राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणाच्या चर्चा झाल्या होत्या. मात्र अजितदादांच्या निधनानंतर विलिनीकरणाच्या चर्चांना पूर्णविराम लागला, असंही सुनील तटकरेंनी सांगितले. तसेच मी खासदार आहे. मुख्यमंत्र्यांची प्रत्येकवेळी होणारी भेट राजकीय असते, असं नाही. मतदारसंघातील कामे देखील असतात. ज्यावेळी राजकीय बैठका असतात, त्यावेळी सुनेत्रा पवार यांना त्याबाबत माहिती असते. मी ४० वर्षे राजकारणात आहे. मला राजशिष्टाचार माहिती आहे, असं सुनील तटकरे यांनी स्पष्ट केलं. तसेच सुनील तटकरे आणि प्रफुल पटेल यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांसोबत झालेल्या बैठकीबाबत सुनेत्रा पवार यांना अंधारे ठेवल्याची चर्चा रंगली होती. मात्र सुनेत्रा पवार आणि आमच्यात चांगलं ट्यूनिंग आहे. सुनेत्रा पवारांना आम्ही सगळ्या गोष्टी सांगतो, असंही सुनील तटकरे म्हणाले.

गेल्या अधिवेशनात डिलिमिटेशन आलं, त्यावेळी मी मतदान केलं आहे. त्यांच्या (शरद पवारांची राष्ट्रवादी) पक्षाने पाठिंबा द्यावा, न द्यावा हा त्यांचा प्रश्न आहे. सुप्रिया सुळे यांचं म्हणणं देखील मी ऐकलं आहे. डिलिमिटेशन बिलाला समर्थन करणं, म्हणजे एनडीएसोबत आलं असा अर्थ होतं नाही, असंही सुनील तटकरे म्हणाले. दरम्यान, रविवारी मी, पार्थ पवार, प्रफुल पटेल दिल्लीत असणार आहेत. यावेळी सच्चिदानंद सिंह यांनी पाठवलेल्या नोटीसबाबत उत्तर द्यायचं की नाही, याबाबत निर्णय घेणार आहोत, असं सुनील तटकरेंनी सांगितलं.

## 'दिलखुलास'मध्ये पंढरपूर वारीच्या यशस्वी प्रशासकीय व्यवस्थापनाचा वेध; यशदाचे महासंचालक डॉ. सुहास दिवसे यांची विशेष मुलाखत



**मुंबई/प्रतिनिधी :** माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'दिलखुलास' कार्यक्रमात ''पंढरपूर वारीच्या यशस्वी प्रशासकीय व्यवस्थापनाचा वेध'' या विषयावर यशदाचे महासंचालक डॉ. सुहास दिवसे यांच्या अनुभवावर आधारित विशेष मुलाखत प्रसारित होणार आहे.

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, आध्यात्मिक आणि सामाजिक परंपरेचे प्रतीक असलेली पंढरपूर आषाढी वारी ही सातशे वर्षांची अखंड परंपरा आहे. दरवर्षी लाखो वारकरी विठ्ठलाच्या दर्शनासाठी पायी पंढरपूरकडे प्रस्थान करतात. या भव्य सोहळ्याचे सुरक्षित, सुव्यवस्थित आणि सुरळीत व्यवस्थापन करण्यासाठी विविध शासकीय विभागांच्या समन्वयातून व्यापक प्रशासकीय नियोजन केले जाते. या नियोजनामागील कार्यपद्धती, अनुभव आणि प्रभावी व्यवस्थापनाची सविस्तर माहिती या मुलाखतीतून जाणून घेता येणार आहे.

'दिलखुलास' कार्यक्रमात ही मुलाखत शनिवार, १८ जुलै, सोमवार, २० जुलै, मंगळवार, २१ जुलै आणि बुधवार, २२ जुलै रोजी सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरून तसेच 'न्यूज ऑन एआयआर' या मोबाईल ॲपवर प्रसारित होणार आहे. कार्यक्रमाचे निवेदन सुषमा जाधव यांनी केले आहे.या मुलाखतीत डॉ. सुहास दिवसे यांनी पालखी मार्गाचे नियोजन, वाहतूक व्यवस्था, पोलीस बंदोबस्त, आरोग्य सेवा, स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, आपत्ती व्यवस्थापन, नियंत्रण कक्षाची कार्यपद्धती तसेच महसूल, पोलीस, आरोग्य, सार्वजनिक बांधकाम, ग्रामविकास, स्थानिक स्वराज्य संस्था आणि इतर संबंधित विभागांतील समन्वयाची सविस्तर माहिती दिली आहे. तसेच मोठ्या लोकसमूहाच्या व्यवस्थापनासाठी आवश्यक असलेले पूर्वनियोजन, प्रत्यक्ष अंमलबजावणी आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर याविषयीही त्यांनी मार्गदर्शन केले आहे.

वारीच्या काळात प्रशासन, स्थानिक यंत्रणा, स्वयंसेवी संस्था आणि वारकरी यांच्यातील समन्वयातून श्रद्धा आणि सुयोग्य व्यवस्थापनाचा प्रभावी संगम कसा साधला जातो, तसेच सार्वजनिक प्रशासनातील उत्तम नियोजनाचे हे प्रेरणादायी उदाहरण कसे ठरते, याचा उलगडा या विशेष मुलाखतीत करण्यात आला आहे.

# कृषी विभागाची मोफत 'डिजिटल शेतीशाळा'

### शेतकऱ्यांना घरबसल्या मिळणार आधुनिक शेतीचे धडे

**लातूर/प्रतिनिधी :** बदलत्या हवामानात शाश्वत शेतीचे व्यवस्थापन करण्यासाठी आणि शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी करण्याच्या उद्देशाने कृषी विभाग, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा) आणि पाणी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत 'डिजिटल शेतीशाळा' हा महत्त्वाकांक्षी उपक्रम राबवला जात आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकरी, महिला शेतकरी गट आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांनी (FPCs) यात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन लातूरच्या विभागीय कृषी सहसंचालकांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

या उपक्रमांतर्गत राहुरी, परभणी, दापोली आणि अकोला कृषी विद्यापीठांतील नामवंत कृषी शास्त्रज्ञ शेतकऱ्यांना ऑनलाईन (Zoom आणि YouTube च्या माध्यमातून) मार्गदर्शन करणार आहेत. अतिवृष्टी किंवा पावसाचा खंड अशा प्रतिकूल हवामानात पिके वाचवण्याचे तंत्रज्ञान, जीवामृतासारख्या जैविक निविष्ठांची निर्मिती आणि रासायनिक खतांचा खर्च कमी करण्याबाबत थेट प्रात्यक्षिकासह माहिती दिली जाणार आहे. विशेष म्हणजे, या लाईव्ह सत्रादरम्यान शेतकरी शास्त्रज्ञांना प्रश्न विचारून आपल्या शंकांचे जागेवरच निरसन करून घेऊ शकणार आहेत.

ही शाळा संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी पूर्णपणे मोफत असून, सोमवार ते शनिवार दररोज विविध पिकांसाठी झूमवर सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. या वेळापत्रकानुसार बाजरी, सोयाबीन, ख. ज्वारी, कापूस, भुईमूग, भात, राजमा, मका, नाचणी, तूर-मूग-उडीद आणि भाजीपाला या प्रमुख पिकांवर संध्याकाळी ६.१५ आणि ७.३० वाजता तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळेल.

शेतकरी वैयक्तिकरित्या किंवा गटाच्या माध्यमातून झूम ॲपद्वारे (ID व Passcode वापरून) या सत्रात सहभागी होऊ शकतात. तसेच, 'कृषी विभाग महाराष्ट्र शासन' आणि 'पाणी फाउंडेशन' च्या अधिकृत युट्यूब (YouTube) व फेसबुक चॅनेलवरही याचे थेट प्रक्षेपण केले जाणार आहे. पारंपरिक शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन शेती किफायतशीर करण्यासाठी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

# लातूरमध्ये टाईप-१ मधुमेहग्रस्तांसाठी विशेष कार्यशाळा; ६० मुलांना मोफत सीजीएमएस मशीन, ५०० डॉक्टरांचा सहभाग

**लातूर/प्रतिनिधी :** आरएसएसडीआय महाराष्ट्र चॅप्टर व इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए), लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने बार्शी रोडवरील हॉटेल ग्रँड पोर्टिको येथे टाईप-१ मधुमेहग्रस्त व्यक्तींसाठी विशेष कार्यशाळा तसेच मधुमेह व लठ्ठपणा या विषयावरील एकदिवसीय वैद्यकीय परिषदेचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळेत ग्रामीण भागातील ६० गरजू टाईप-१ मधुमेहग्रस्त मुला-मुलींना अत्याधुनिक सीजीएमएस (सतत ग्लुकोज निरीक्षण प्रणाली) मशीन मोफत बसविण्यात आली. या तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शरीरातील रक्तातील साखरेची पातळी २४ तास, वारंवार बोटाला टोचणी न लावता मोजता येते. त्यामुळे रुग्णांना आहार आणि इन्सुलिनच्या डोसचे योग्य नियोजन करता येते. कार्यशाळेत उपस्थित तज्ज्ञ डॉक्टरांनी टाईप-१ मधुमेहग्रस्त रुग्ण व त्यांच्या पालकांच्या




विविध शंकांचे निरसन करून आधुनिक उपचारपद्धती व जीवनशैलीबाबत मार्गदर्शन केले.

यानंतर मधुमेह व लठ्ठपणा या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या वैद्यकीय परिषदेत लातूर व परिसरातील सुमारे ५०० डॉक्टरांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून लातूरचे खासदार मा. डॉ. शिवाजी काळगे उपस्थित होते. तसेच ज्येष्ठ वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. जी. आर. भराडिया, डॉ. अजय जाधव आणि डॉ. रमेश भराटे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

या परिषदेत मुंबईचे सुप्रसिद्ध मधुमेहतज्ज्ञ डॉ. विजय पनीकर, डॉ. विजय नेगलूर, डॉ. संहिता वालावळकर, डॉ. मनोज चावला, डॉ. राजीव कोविल, डॉ. पूर्वी चावला, डॉ. निखिल नाशिककर, डॉ. व्यंकटेश शिवणे, डॉ. स्नेहल तन्ना, पुण्याचे डॉ. सुहास एरंडे, छत्रपती संभाजीनगरच्या डॉ. अर्चना सारडा व डॉ. मयुरा काळे, नाशिकचे डॉ. नारायण देवगावकर, नांदेडचे डॉ. समीर चंद्रात्रे व डॉ. संतोष मालपाणी (अध्यक्ष, महा-आरएसएसडीआय ), सोलापूरचे डॉ. भास्कर पाटील व डॉ. अनिकेत इनामदार, साताऱ्याचे डॉ. जयदीप रेवले, कोल्हापूरचे डॉ. राजेश देशमाने व डॉ. अदिती देशमाने, रत्नागिरीचे डॉ. अनिरुद्ध फडके तसेच लातूरचे डॉ. विजय ढवळे आणि डॉ. रामदास बरूरे यांनी मधुमेह व्यवस्थापन, लठ्ठपणा नियंत्रण आणि आधुनिक उपचारपद्धतींवर सखोल मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे आयोजन डॉ. चंद्रशेखर अष्टेकर (उपाध्यक्ष, महा-आरएसएसडीआय ), डॉ. चांद पटेल, डॉ. प्रदीप नागुरे, डॉ. निखिल दरक तसेच आयएमए लातूरचे अध्यक्ष डॉ. हर्षवर्धन राऊत, सचिव डॉ. विश्रांत भारती, डॉ. श्वेता काटकर आणि डॉ. आकांक्षा त्रिपाठी यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. बालाजी पुरी, डॉ. श्याम तोष्णीवाल, डॉ. प्रदीप इंदलकर, डॉ. शीतल पाटील, डॉ. स्नेहल शिवपुजे, डॉ. शीतल सोमाणी, डॉ. अभिजित यादव, डॉ. अमोल शेकडे, डॉ. चेतन सारडा, सदानंद कांबळे, डॉ. किरण डावळे, डॉ. ओमप्रकाश भोसले, डॉ. गजानन चव्हाण, डॉ. शिरीष पाटील आणि डॉ. महेश शिंदे यांनी विशेष परिश्रम घेतले.

ग्रामीण भागातील टाईप-१ मधुमेहग्रस्तांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून देणे, त्यांचे जीवनमान उंचावणे आणि वैद्यकीय क्षेत्रातील नव्या संशोधनाची माहिती डॉक्टरांपर्यंत पोहोचविणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.